**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६.**

एकात्मिक सायकल आराखडा मंजूर विकास योजनेमध्ये समाविष्ट करणेसाठी कलम ३७ (१) व १५४ अन्वये निदेश...

**महाराष्ट्र शासन.**
**नगर विकास विभाग**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

शासन निर्णय क्र. टिपीएस-१८१८/२१४५/प्र.क्र.३३६/१८/नवि-१३
**दिनांक :- ०१/०२/२०१९.**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६**

प्रस्तावना:- पुणे महानगरपालिकेच्या मुळ हद्दीची व वाढीव हद्दीची विकास योजना (यापुढे " उक्त विकास योजना" असे उल्लेखिलेली) अनुक्रमे शासनाच्या नगर विकास विभागाची अधिसूचना क्र.टिपीएस १८१५/२०९/ प्र.क्र.६९/१५/डीपी मंजूरी/नवि-१३, दि.०५/०१/२०१७ व टिपीएस १८०८/ २४७/ प्र.क्र.१४०८/ ०८/वियो मंजूरी/नवि-१३, दि.०२/०३/२०१२ (यापुढे जिचा उलेख "उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे) अन्वये मंजूर झालेली आहे. नागरी वाहतुक नियोजन योजनेअंतर्गत महानगरपालिकेने केंद्र शासनास सादर केलेल्या सायकल आराखड्यास केंद्र शासनाने दि.२०/०२/२०१४ रोजीच्या पत्रान्वये मंजूरी दिलेली असून त्यामध्ये एकात्मिक सायकल आराखडा तरतूद विकास आराखड्यात वैधानिक तरतूदींचा विचार करुन समाविष्ट करणेबाबत कळविले आहे. यानंतर या आराखडयास पुणे महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने दि.१४/१२/२०१७ रोजीच्या ठरावाद्वारे मान्यता दिलेली आहे. सबब पुणे महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेमध्ये एकात्मिक सायकल आराखडा तरतूद केंद्र शासनाचे पत्रातील अटी शर्तींचे पालन करुन समाविष्ट करणे उचित होणार असल्याचे शासनाचे मत झाले आहे. त्यामुळे या उद्देशासाठी, शासन पुणे महानगरपालिकेस महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये कलम १५४ सह प्राप्त अधिकाराचा वापर करुन खालीलप्रमाणे निदेश देत आहे :-

*'निदेश*

" पुणे महानगरपालिकेच्या उक्त विकास योजनेमध्ये एकात्मिक सायकल आराखडा अंतर्भूत करण्यासाठी पुणे महानगरपालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये आवश्यक फेरबदलाची वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन प्रस्ताव शासनाच्या मंजूरीसाठी सादर करावा. तसेच सदर तरतूद निदेशाच्या दिनांकापासून अंमलात आणावी ."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

URBAN DEVELOPMENT DEPTT. सत्यमेव जयते MANTRALAYA, MUMBAI-32

(रा.म.पवार)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

**प्रति:-**
आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे.

**प्रत माहितीसाठी :-**

१) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य पुणे,
२) सह संचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे.
३) सहायक संचालक, नगर रचना, पुणे शाखा, पुणे.